**तलाठी साझा पुनर्रचना समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुनर्रचना करण्यात आलेल्या तलाठी साझे व महसूल मंडळाकरिता पदनिर्मिती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्राफेब-२०१०(तलाठी)/प्र.क्र.११२(भाग-३)/म-१०**
पहिला मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०७ डिसेंबर, २०२२

**वाचा** :-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. प्राफेब-२०१०/(तलाठी)/प्रक्र ११२/म-१०, दिनांक ०३.०२.२०१४ व समक्रमांकित शासन शुध्दीपत्रक दिनांक १८.०२.२०१४.
२. विभागीय आयुक्त, नागपूर यांचे अ.शा.प. क्र.मशा/कार्या.७(२)/सीआर-२/२०१४, दि.२१.०८.२०१४
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. प्राफेब-२०१०(तलाठी)/प्रक्र ११२(भाग-३)/म-१०, दिनांक १६.०५.२०१६
४. महसूल व वन विभाग पत्र क्र. प्राफेब-२०१०(तलाठी)/प्रक्र ११२(भाग-३)/म-१०, दिनांक १५.११.२०१६
५. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. आकाअ/भूसुधार/अ.का. २/ प्र.क्र./६०/२०१६, दिनांक ५.१२.२०१६
६. विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक मशा/ ७(२)/सीआर ०२(१४)/२०१६, दिनांक ६ डिसेंबर, २०१६
७. मा.मुख्य सचिव कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक २२.०५.२०१७ चे पृष्ठाकंन.( मंत्रीमंडळ बैठकीचे कार्यवृत्त )
८. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. प्राफेब-२०१०/(तलाठी)/प्र.क्र.११२/(भाग-३)/म-१०, दिनांक २५.५.२०१७
९. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. प्राफेब-२०१०/(तलाठी)/प्र.क्र.११२/(भाग-३)/म-१०, दिनांक २४.०७.२०१८.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य तलाठी महासंघाच्या मागण्यांसंदर्भात अभ्यास करुन शासनांस व्यवहार्य व अभ्यासपूर्ण शिफारसी करण्यासाठी संदर्भीय क्रमांक १ वरील शासन निर्णय, दिनांक ०३.०२.२०१४ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १८.०२.२०१४ अन्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती.

तलाठी साझा पुनर्रचना समितीने मंत्रिपरिषदेला दि.२६/०४/२०१६ रोजी सादर केलेला अहवाल व अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात यावी व मंत्रिमंडळ उपसमितीचा अहवाल मंत्रिमंडळाच्या अंतिम निर्णयार्थ सादर करण्यात यावा असा निर्णय घेतला. त्यानुषंगाने संदर्भीय क्रमांक ३ वरील शासन निर्णय दिनांक १६.५.२०१६ अन्वये मा.मंत्री (महसूल )यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने अहवाल मंत्रीमंडळाच्या अंतिम मान्यतेसाठी दिनांक १६.०५.२०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील तलाठी साझांची पुनर्रचना

करुन महसूली विभागनिहाय नवीन तलाठी साझे व महसूली मंडळे स्थापन करण्यास व सदर कार्यालये कार्यान्वित करण्यासाठी अनुक्रमे संदर्भाधिन क्र. ८ व ९ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली.

आता, मा.मंत्रीमंडळाच्या दि. १६.०५.२०१७ च्या बैठकीतील निर्णयानुसार नव्याने स्थापन करण्यात आलेल्या तलाठी साझे व मंडळ कार्यालयांसाठी एकूण ३११० तलाठी व ५१८ मंडळ अधिकारी याप्रमाणे एकूण ३६२८ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उप समितीने दि.२८.१.२०२२ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय सचिव समितीने दि. २९.०४.२०२२ रोजी दिलेल्या मान्यतेप्रमाणे तलाठी साझा पुनर्रचनेनुसार विहीत केलेल्या निकषाच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडून महसूली विभागनिहाय प्राप्त माहितीस अनुसरुन वाटप करण्यात आलेल्या ३११० तलाठी साझे व ५१८ महसूली मंडळ कार्यालयांसाठी ३११० तलाठी व ५१८ मंडळ अधिकारी असे खालीलप्रमाणे एकूण ३६२८ पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | महसूली विभाग | जिल्हा | तलाठी साझे | महसूली मंडळे |
|---|---|---|---|---|
| १. | **पुणे** | पुणे | ३३१ | ५५ |
| २. | | सातारा | ७७ | १२ |
| ३. | | सांगली | ५२ | ०९ |
| ४. | | सोलापूर | १११ | १९ |
| ५. | | कोल्हापूर | ३१ | ०५ |
| | | **एकूण** | **६०२** | **१००** |
| ६. | **अमरावती** | अमरावती | ३४ | ०६ |
| ७. | | अकोला | ८ | ०१ |
| ८. | | यवतमाळ | ५४ | ०९ |
| ९. | | बुलढाणा | १० | ०२ |
| १०. | | वाशिम | ० | ० |
| | | **एकूण** | **१०६** | **१८** |
| ११. | **नागपूर** | नागपूर | ९४ | १६ |
| १२. | | चंद्रपूर | १३३ | २३ |
| १३. | | वर्धा | ५० | ०८ |
| १४. | | गडचिरोली | ११४ | १९ |
| १५. | | गोंदिया | ४९ | ०८ |
| १६. | | भंडारा | ३८ | ०६ |
| | | **एकूण** | **४७८** | **८०** |
| १७. | **औरंगाबाद** | औरंगाबाद | ११७ | १९ |
| १८. | | जालना | ८० | १३ |
| १९. | | परभणी | ७६ | १३ |
| २०. | | हिंगोली | ६१ | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१. | | बीड | १३८ | २३ |
| २२. | | नांदेड | ८४ | १४ |
| २३. | | लातुर | ३९ | ०७ |
| २४. | | उस्मानाबाद | ९० | १५ |
| | | **एकूण** | **६८५** | **११४** |
| २५. | **नाशिक** | नाशिक | १७५ | २९ |
| २६. | | नंदुरबार | ० | ० |
| २७. | | धुळे | १६६ | २८ |
| २८. | | जळगाव | १४६ | २४ |
| २९. | | अहमदनगर | २०२ | ३४ |
| | | **एकूण** | **६८९** | **११५** |
| ३०. | **कोंकण** | मुंबई | १९ | ४ |
| ३१. | | मुंबई उपनगर | ३१ | ३ |
| ३२. | | पालघर | ८६ | १६ |
| ३३. | | ठाणे | ७२ | १० |
| ३४. | | रायगड | १४० | २२ |
| ३५. | | रत्नागिरी | १०३ | १८ |
| ३६. | | सिंधुदूर्ग | ९९ | १८ |
| | | **एकूण** | **५५०** | **९१** |
| | **एकूण** | | **३११०** | **५१८** |

३. सदर अधिकारी /कर्मचारी यांच्या वेतनावर येणारा खर्च, मागणी क्र. सी-१ , मुख्य लेखाशिर्ष २०५३, जिल्हा प्रशासन आणि खालील तक्त्यातील नमुद स्तंभ ४ व ६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

| **अ. क्र.** | **महसूल विभागाचे नांव** | **तलाठी पदे (वेतनश्रेणी S-८:२५५००-८११००)** | **लेखाशिर्ष** | **मंडळ अधिकाऱ्यांची पदे (वेतनश्रेणी S-१२:३२०००-१०१६००)** | **लेखाशिर्ष** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | कोकण | ५५० | २०५३ ०३१३ | ९१ | २०५३ ०२४२ |
| २ | नाशिक | ६८९ | २०५३ ०३२२ | ११५ | २०५३ ०२५१ |
| ३ | पुणे | ६०२ | २०५३ ०३३१ | १०० | २०५३ ०२६२ |
| ४ | औरंगाबाद | ६८५ | २०५३ ०३६९ | ११४ | २०५३ ०२९८ |
| ५ | नागपूर | ४७८ | २०५३ ०३५१ | ८० | २०५३ ०२८९ |
| ६ | अमरावती | १०६ | २०५३ ०३४२ | १८ | २०५३ ०२७१ |
| | **एकूण** | **३११०** | | **५१८** | |

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौ.सं.क्र.३९४/२०२१, व्यय-९, दि.६.१०.२०२१ व अनौ.सं.क्र.३३२/ आ.पु.क. दि.२०.६.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२२१२०७१७३६१२६०१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( डॉ. नितिन करीर )**
अपर मुख्य सचिव

**प्रत :-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्रालयीन विभाग यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
८. अ.मु.स. (महसूल)यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व उपविभागीय अधिकारी
१२.सर्व तहसिलदार
१३.महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५.विभागातील सर्व कार्यासने
१६.निवडनस्ती, म-१० कार्यासन.